# राशिभविष्य - जुलै, २०१४.

दादा दामले (dadadamle@gmail.com)

=========================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही असेच म्हणावे लागेल. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्ध अनुकुलव लाभदायक होईल. उच्च राशीतील गुरु ग्रहामुळेही महिन्याच्या पूर्वार्धातच अपेक्षित असे सर्व कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभेल. महिन्याच्या उत्तरार्धात आप्तेष्टाकडून मनस्ताप दिला जाणे संभवते. पण स्थावर खरेदी-विक्रीचे व्यवहार मनासारखे होतील. मात्रमंगळ ग्र हाच्या प्रतिकुलतेमुळे शारीरिक -मानसिक अनारोग्य त्रस्त करण्याची दाट शक्यता आहे. जपा. रक्तविकार असेल तर तो बळावेल. हृदयविकार असलेल्यांनी मन शांत ठेवावे व अति विचार करू नये. वैवाहिक जीवनात वाद, मतभेद, भांडणे, अनारोग्य आदि कारणांनी सुखसमाधान मिळणे कठीण दिसते. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनीही भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. परधर्मीयांशी व्यावसायिक संबध असणारांना काळ लाभदायक होईल. आर्थिक व्यवहार जपून व फसवणूक होणार नाही याची काळजी घेऊनच करा. कुमार्गी मित्रांपासून सावध राहा. लहरी स्वभावावर अंकुश ठेवा. श्रद्धा असेल तर श्रीगजानन उपासना अनुकुल होईल.

**(२) वृषभ -** या राशीची मंडळी लहरी, चंचल स्वभावावर नियंत्रण ठेवू शकली तर अकारण होणाऱ्या खर्चावर नियंत्रण ठेवले जाऊन आर्थिक फसवणूकही टळू शकेल. याच कारणावरून घरच्यांशी होणारे वाद, भांडणे होणेही टळेल. शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने होणाऱ्या आर्थिक लाभाचे

सुखसमाधान अनुभवू शकाल. महिन्याच्या पूर्वार्धात रवि ग्रह व उत्तरार्धात मंगळ ग्रह प्रतिकुल असणार असल्याने उष्णता विकारांचा त्रा स होणे संभावते. हृदयविकार असलेल्यांनी विशेष जपले पाहिजे. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या नोकरदार मंडळीना नोकरीत अपेक्षित सुखसमाधान लाभेल; तर काहीना बढती, अधिकारपद असे काही मिळणेही संभवते. उच्च राशीतील गुरु ग्रहामुळे उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्रअसणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकूल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या लेखक मंडळीचे लेखन ग्रंथरूपाने प्रकाशित होईल. परधर्मीयांशी व्यावसायिक संबध असणारांना महिन्याचा पूर्वार्धच लाभादायक होईल. ामानसोपचारतज्ज्न्य द्रव पदार्थाचे व्यापारी यांांनासंपूर्णमहिन्याचा काळ अनुकूल व लाभदायक होईल. मित्रांशी वाद, भांडणे टाळा. विविध कारणांनी संततीसुखात बाधा येणे संभवते. श्रद्ध ेनेशिवोपासनाकरा.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या संपूर्ण काळात शारीरिक-मानसिक आरोग्य सांभाळता आले व समजूतदारपणे आचरण करणे जमले तरच त्यांना कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभू शकेल. तसेच ते उद्योग-व्यवसायात प्रगती करू शकतील. कुटुंबात घडणार्‍याशुभ घटनांचा आनंद लुटू शकतील. या राशीच्या काही मंडळीना राहत्या जागेची समस्या किंवा स्थावरसंबंधी समस्या त्रस्त करण्याची दाट शक्‍यता दिसते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. महिन्याच्या उत्तरार्धात संततिविषयक समस्या त्रस्त करण्याची शक्यता आहे. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे सुखशांती मिळू शकेल. काही भाग्यवान मंडळीना सूचक स्वप्ने पडतील तर काहीना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या युवकांनी हातची नोकरी वा

व्यवसाय सोडून नवीन काही करण्याचा विचारही करू नये. काळ अनुकूल नाही. चिकित्सक बौद्धिक नोकरी व्यवसाय असणारांना काळ प्रगतिकारक व लाभदायक होईल. मुत्सद्दी - राजकारणी मंडळीना काळ अनुकुल होईल. दलाली कमिशनवर व्यवसाय करत असणारांनाही काळ लाभदायक होईल. श्रद्धा असेल तर “ बावन्न श्लोकी गुरुचरित्रा “ चे पठण करा.

**(४) कर्क -** सतत मनाविरुद्ध घटना घडणे, नियोजित कार्यात अडचणी, अडथळे निर्माण होणे, मानहानी होणे, कसली तरी चिंता सतावणे अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप होणे संभवते. त्यामुळेच शारीरिक-मानसिक अनारोग्य बळाव्ण्याची शक्यता दिसते. जपा. कुसंगतीपासून जपा. दिनांक १३ रोजी विशेष जपा इजा होण्याची दाट शक्यता आहे. अशा परिस्थितीत शुक्र ग्रहाच्या काही प्रमाणातील अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकूल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. वाद, मतभेद, भांडणे, गैरसमज अशापैकी कारणांनी कौटुंबिक सुख व गृहसौख्य हानी होणे संभवते. जपा. काही मंडळीना राहत्या जागेची समस्या त्रस्त करील; तर काहीना स्थावरसमस्या त्रस्त करील. जलप्रवास करू नका. पोहावयास गेलात तर सरळ पोहा; उद्या मारू नका. कारण जल भय आहे. जपा. तसेच शक्यतो बाहेरचे उघडे पदार्थ खाऊ नका. विष भय संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात ढोंगी आचरण होणे संभवते. तसेच संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या युवकांनी वर्तमान नोकरी-व्यवसायच मनापासून करावा. नवीन काही करण्याचा विचारही करू नये. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्री गुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा.

**(५) सिंह -** या राशीच्या मंडळीनी या महिन्याच्या काळात शारीरिक मानसिक आरोग्याकडे लक्ष देणे आवश्यक होईल. असह्य मनस्तापामुळे शारीरिक उष्णता भडकून उष्णता विकारांचा त्रास होणे संभवते. काहींना त्वचा रोगाचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. शिवाय अपघात भय असून इजा होणे शक्य असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करणे अगत्याचे होईल. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल होणार असून या राशीच्या कलाकार मंडळीना महिन्याचा उत्तरार्ध अनुकुल व लाभदायक होईल. सुखसमाधान लाभेल. महिन्याच्या उत्तरार्धात मनस्ताप, चिंता अशापैकी कारणांनी नैराश्य येणे संभवते. या राशीच्या युवकांना उत्तम नोकरी किंवा नवे आवडते कार्यक्षेत्रमिळणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात वाद, भांडणे, आर्थिक समस्या अशापैकी कारणांनी कौटुंबिक सुख समाधान लाभण्याची शक्यता दिसत नाही. जपा. तसेच जीवनसाथीचे अनारोग्य, मतभेद अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखातही बाधा येणे संभवते. जपा. अशा प्रतिकुल परिस्थितीत आध्यात्मिक उपासनेत मन गुंतवलेत तर मनावरील ताण खूपच कमी होईल. शिवाय महिन्याच्या उत्तरार्धात शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व खूप बरे वाटेल. कुलदैवताची उपासना अनुकुल होईल.

**(६) कन्या -** या राशीच्यामंडळीनी वर्तमान हटटी, हेकट, जिद्दी , संतापी स्वभावाला लगाम घालून मनावर व विचारावर ताबा ठेवून तसेच सहनशील बनून आचरण केले तरच सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राहील व नोकरी-व्यवसायातील अनुकुल काळाचा लाभ घेणे शक्य होईल. नपेक्षा उष्णताविकार व वातविकारांनी अनारोग्य होणे संभवते. महिन्याच्या

उत्तरार्धात शनि-मंगळ कुटुंबस्थानी एकत्र येत असल्यामुळे विविध कारणांनी कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. जपा. तसेच आर्थिक समस्याही त्रस्त करतील. या राशीच्या काही मंडळीना उगीचच आपल्याला काही आजार झाल्याची भावना निर्माणहोईल व ते काल्पनिक चिंता करून स्वत:लाच त्रास करून घेतील. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळीना तसेच सर्व प्रकारचे बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. कलाक्षेत्रातीलमंडळीना मात्र महिन्याचा पूर्वार ्धचअनुकूल व लाभदायक होईल. जीवन्साथीचे लहरी, विक्षिप्त आचरण, दोघांतील वाद, भांडणे अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी संशय, गैरसमज, मतभेद अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल.

**(७) तुळा** - गैरसमज, मनाविरुद्ध घटना, वाद, भांडणे, विरोध, जुन्या प्रकरणांचा पुन्हा होणारा त्रास अशापैकी कारणांनी या राशीच्या मंडळीना असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. त्यामुळेच शारीरिक अनारोग्य होण्याची दाट शक्यता दिसते. जपा. हटटी, अहंकारी स्वभावामुळे अकारण श्रम ,दगदग होईल व थकवा येईल. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या पूर्वार्धातजन्मकुंडलीतील योगानुसार भूमी, धन, प्रतिष्ठा अशापैकी काही लाभ होणे शक्य दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात संत सज्जनांचा सहवास लाभेल व सात्विक सुखसमाधान लाभेल .महिन्याच्या पूर्वार्धात गुरु-हर्षल शुभ योगामुळे चिकित्सक बौद्धिक व्यवसाय व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना प्रगतीव यश लाभून अन्य

लाभ होण्याची शक्यता आहे. पण अकारण अति विचार करू नका. डोकेदुखी, ेमेंदुविकार होणेही संभवते. जपा. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती साधणे शक्य होईल. वैवाहिक जीवनातही विविध कारणांनी अपेक्षित सुखसमाधान लाभणे अशक्य होईल. या राशीच्या काही मंडळीना परदेशगमनाची संधी मिळेल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकूल होईल.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळीनी या संपूर्ण महिन्याच्या काळात आर्थिक व्यवहार सावधानतेने, विचारपूर्वक व जाणकारांच्या अनुभवी सल्ल्यानेच करावेत, असे आवर्जून सांगावेसे वाटते. महिन्याच्या पूर्वार्धात राहूमुळे आर्थ िक लाभ होणे संभवते. तसेच काहींना परदेशगमनाची संधीही मिळू शकेल. पण उत्तरार्धात या राशीच्या व्ययस्थानी शनि-मंगळ एकत्र आल्यावर परिस््थितीत खूप बदल होणे संभवते. असह्य मनस्ताप देणाऱ्या घटना घडणे संभवते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या शासकीय, निमा-शासकीय नोकरदार मंडळीना बढती, अधिकारपद, पगारवाढ अशापैकी लाभ होण्याची शक्यता दिसते. मात्र वाम मार्ग धन सहज मिळणे शक्य असले तरी तो मोह टाळाच्र होत्याचे नव्हते होईल. जपा. महिन्याच्या पूर्वार्धात मित्रांशी वितुष्ट येणे संभवते. जपा. तसेच कष्ट परिश्रमानेच अपेक्षित अर्थ लाभ मिळवावा लागेल. पण योग असेल तर काहीना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणे संभवते. गुरू-हर्षल शुभ योगामुळे उच्च बौद्धिक , शैक्षणिक , शास््त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. तसेच अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे मानसिक शांती मिळू शकेल. महिन्याच्या उत्तरार्धात बुध-शुक्राच्या अनुकुलतेने धन, मान, यश, कार्यसिद्धी मिळू शकेल. पण या

राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत बाधा येणे संभवते. जपा.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही असेच म्हणावे लागेल. त्यात सध्या या राशीच्या मंडळीचे मन अतिशय हळवे झाले असण्याची शक्यता जाणवते. अशा परिस्थितीत या राशीच्या मंडळीनी सतत मनावर ताबा ठेवून व सहनशील बनूनच आचरण करावे, हे उत्तम . या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात विविध कारणांनी अडथळे येणे संभवते. तसेच मित्रांशी भांडणे होणेही शक्य दिसते. जपा. प्रतिकुल काळ व अस्वस्थ मन यांमुळे आहे त्या परिस्थितीत सुखसमाधान कसे लाभेल ? पण अध्यात्मात रस असणारांना महिन्याचा उत्तरार्ध अतिशय पूर्वार ्धचअनुकूल व लाभदायक होईल. या राशीच्या नोकरदार मंडळीना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. पण वाममार्ग धनाचा मोह अंगाशी येईल. जपा. वैद्यकीय व्यवसाय, औषध विक्रेते यांना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल होईल. स्वत:चे व जीवनसाथीचे अनारोग्य, दोघातील वाद, मतभेद अशा कारणानी वैवाहिक जीवनात सुखसमाधान लाभण्याची शक्यता कमी आहे. जपा. या राशीच्या काही मंडळीना जलप्रवासाचे तर काहीना परदेशगमनाचे योग येतील. जन्मकुंडलीत योग असेल तर या राशीच्या काही भाग्यवान मंडळीना अचानक धनलाभ वा वारसा हक्काने धन मिळणे संभवते. श्रद्धा असेल तर नियमितपणे “ बावन्न श्लोकी गुरुचारेत्रा “चे पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ अनुकुल/प्रतिकुल असे संमिश्र अनुभव देणारा असेल असे दिसते. महिन्याच्या पूर्वार्धात शुभ ग्रहाच्या अनुकुलतेने कौटुंबिक सुख व संततिसुख लाभेल. या राशीच्य ा

नोकरदार मंडळीना नोकरीत अपेक्षित सुख समाधान लाभेल. काहीना अधिकारपद मिळेल तर काहीचा सन्मान होणेही संभवते. उच्च व चिकित्सक बौद्धिक व्यवसाय, वकिली, सल्लागारी व्यवसाय, शास्त्रीय संशोधन कार्‌यक्षेत्र असणारांना तसेच कोळसा, लोखंडी सामान विक्रेत्यांना महिन्याचा पूर्वार्धच अनुकूल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या विवाहेच्छू युवक युवतींचे विवाह ठरतील. नवे प्रेमसंबंध वा स्नेहसंबंध जुळून येतील. पण विविध कारणांनी अपेक्षि त गृहसौख्य मिळण्याची शक्यता कमी आहे. महिन्याच्या उत्तरार्धात दाम्पत्यजीवनात वाद, भांडणे, गैरसमज अशापैकी कारणांनी सुखसमाधान मिळणे अशक्य होईल. त्यामुळे काहीना नैराश्य येणे संभवते. आर्थिक चिंता त्रस्त करतील. अनारोग्य होईल. काहीना पोटविकाराचा तर काहीना मूत्राश यविकाराचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. शक्यतो प्रवास टाळा; कारण प्रवासात मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. श्रद्धा असेल तर कुलदैवताची उपासना करा.

**(११) कुंभ -** सध्या या राशीच्या मंडळीचे मन अति कोमल झाले असण्याची शक्यता जाणवते. त्यामुळे मानसिक संवेदना अति शीघ्र होत असतील तर मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी लगेच गहरे नैराश्य येत असावे, असे वाटते. अशा परिस्थितीत चंचल, अस्थिर बुद्धीमुळे अविचाराने खर्च होईल व आर्थिक चिंता निर्माण होईल. जपा. तसेच जिभेला लगाम घाला व जमल्यास मौन व्रत धारण करा. त्यामुळे आप्तजन दुखावले जाणार नाहीत. सहनशील व्हा आणि मनावर ताबा ठेवून सतत आचरण करा. अध्यात्मात मन गुंतवलेत तर विचारांची खळबळ शांत होईल. शेती व्यवसाय असणारांना महिन्याच्या पूर्वार्धातअपेक्षेपेक्षा अधिक लाभ होणे संभवते. कौटुंबिक सुख व

गृहसौख्य लाभेल. पण विविध कारणांनी संतती सुखात बाधा येणे संभवते. नोकरीत वरिष्ठाचा त्रास सहन करावा लागेल. त्यामुळे अनारोग्य होणे संभवते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात आरोग्य सुधारेल, नोकरीत अनुकुल परिस्थिती निर्माण होईल. कला व यांत्रिकतांत्रिकनोकरी , व्यवसाय, वैद्यकीय व्यवसाय, औषध विक्रेते , बौद्धिक , शैक्षणिक कार्यक् षेत्र असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. दूरच्या प्रवासाचे योग संभवतात. पण अपघात भय असल्याने सतत सावधानतेने आचरण करा. दररोज बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण करा.

**(१२) मीन -** सध्या या राशीच्या मंडळीचा स्वभाव अत्यंत लहरी, अस्थिर, चंचल असा झालाअसण्याची शक्यता जाणवते. तसे असेल तर कोणाचा धाक वा कोणी केलेला उपदेश सहन होत नसेल. अशी अवस्था असेल तर प्रयत्नपूर्वक भावविचारांवरनियंत्रण ठेवा. त्यामुळे अनुकुल काळाचा लाभ घेणे शक्य होईल व स्वभावही स्थिर व शांत होईल. विशेष करून उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधनकार्यक्षेत्र असणारांनी अशा प्रकारे आचरण केल्यास त्यांना येणारे नैराश्यही नाहीसे होईल व ते उत्साहाने आपल्या नियोजित कार्यात प्रगती करू शकतील. विशेष करून महिन्याच्या उत्तरार्धात त्याचा अनुभव येईल. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. तसेच शुभ ग्रहांच्या अनुकुलतेमुळे या राशीच्या सर्वांनाच काही ना काही लाभ होईलच असे वाटते. पण रवि-मंगळ हे दोन्ही ग्र ह प्रतिकूल असल्यामुळे कौटुंबिक सुखात व वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. त्यामुळे शारीरिक -मानसिक अनारोग्य होणेही शक्य आहे जपा. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकूल होईल. त्याचा लाभ उठवा. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी संशय, वाद, मतभेद अशा कारणांनी

भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. अपघात भय आहे. जपा. श्रद्धा असेल तर गुरु दत्तात्रेयाची व श्रीहनुमानाची उपासना करा.

=====ooo0ooo=====